**मंडळाची कामे :- मंडळाची कामे पुढीलप्रमाणे असतील:-**

(क) विद्युत ठेकेदारांना अनुज्ञप्ती देणे;
(ख) विद्युत पर्यवेक्षक व तारतंत्री यांच्यासाठी परीक्षा आयोजित करणे आणि पर्यवेक्षक (Supervisor) व तारतंत्री यांच्यासाठी आयोजित केलेल्या परीक्षांकरिता राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने पाठ्यक्रम विहित करणे ;
(ग) विद्युत पर्यवेक्षक आणि तारतंत्री यांना क्षमता प्रमाणपत्र आणि परवाना देणे;
(घ) चुकीचे असल्याचे आढळून आलेल्या अर्जाचा आणि दाखल्यांचा परामर्श घेणे आणि त्यावर योग्य वाटेल अशी कारवाई करणे ;
(ङ) या नियमान्वये स्थानिक परीक्षा आणि चाचण्या घेण्यासाठीच्या पुढील प्रयोजनासाठी राज्यातील विविध केंद्रावर प्रतिनिधींना नामनिर्देशित करणे;
(च) विद्युत ठेकेदार, पर्यवेक्षक आणि तारतंत्री यांच्या गैरव्यवहार प्रकरणांची सुनावणी करणे आणि त्याबाबत निर्णय घेणे ;
(छ) नियमांची उद्दिष्टे पार पाडणे;
(ज) विद्युत पर्यवेक्षक आणि तारतंत्री यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी द्यावयाच्या अनुग्रह गुणांसंबंधी निर्णय घेणे ;
(झ) उपसमित्या किंवा प्राधिकरण स्थापन करणे आणि मंडळाला योग्य वाटेल त्याप्रमाणे आपले असे अधिकार त्या उपसमित्यांना किंवा प्राधिकरणाला प्रदान करणे ;
(ञ) विद्युत ठेकेदार, विद्युत पर्यवेक्षक आणि तारतंत्री यांचे अनुज्ञप्ती/प्रमाणपत्र / परवाना निलंबित करणे किंवा रद्द करणे.

**टीप.** - मंडळाने आपले कर्तव्य पार पाडताना दिलेला कोणताही निर्णय हा अंतिम असेल.

**Functions of Board : - The functions of the Board shall be :-**
(a) To grant licenses to Electrical Contractors;
(b) To conduct examinations for Supervisors and Wiremen and to prescribe syllabus for Supervisors and Wiremen Examination with prior approval of the State Government;
(c) To grant certificate and permit to Supervisors and Wiremen;
(d) To deal with applications and testimonials found to be incorrect and to take such action as deemed fit;
(e) To nominate representatives in the various centers of the State for the following purpose of carrying out local examinations and tests under these rules;
(f) To hear and decide cases of malpractices by the Electrical Contractors, Supervisors and Wiremen;
(g) To carry out the purposes of the rules;
(h) To take decisions regarding grace marks to be granted for passing the examination for Supervisor and Wireman;
(i) To appoint Sub-Committees or Authority and delegate such of its power to these Committees or Authority as the Board considers fit;
(j) To cancel or suspend licenses of Electrical Contractors, Electrical Supervisors and Wireman.
**Note**:- Any decision given by the Board in the execution of its functions shall be final.